Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील वेतन अनुदान योजनेखालील वर्ग ४ मधील सर्व सेवकांना कळविण्यात येते की, जे सेवक विद्यापीठाच्या सेवेत येण्यापूर्वी अगर सेवेत रूजू झालेनंतर एस.एस.सी. (इंग्रजी व मराठी विषयासह) अगर तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. अशा कर्मचाऱ्यांची सेवानियम १९८४ मधील तरतुद क्रमांक (३) III (२) (ए) (बी) नुसार त्यांच्या जेष्ठतेनुसार वर्ग ३ मधील कनिष्ठ सहायक पदासाठी जेष्ठतायादी तयार करण्यात येत आहे. यास्तव संबंधित कर्मचाऱ्यांनी सेवेत आल्याची तारीख, एस.एस.सी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, टंकलेखनातील आवश्यक गती (इंग्रजी ४० श.प्र.मि. आणि मराठी ३० श.प्र.मि.) असल्यास नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट) व सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०/०५/२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र असल्यास सोबत छायांकीत प्रत इ. माहितीसह अर्ज **दि.१६/०२/२०१८** अखेर कार्यालयीन वेळेत सादर करावे.

जे कर्मचारी विचारणा केलेली माहिती मुदतीत देणार नाहीत त्यांचा जेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधित कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी सदरचे परिपत्रक प्रसिध्द होण्याच्या अगोदर कनिष्ठ सहायक पदाच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये नाव समाविष्ट करणेबाबतचा अर्ज कार्यालयास सादर केला आहे, त्यांनी देखील सदर परीपत्रकानुसार अर्ज करावा, अन्यथा जेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना /** 360

**दिनांक :-** 5 FEB 2018

**प्रति,**

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.

२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी

३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख

४. स्वीय सहाय्यक - मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप :- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व वर्ग ४ मधील सेवकांच्या निदर्शनास आणावे.**